**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

**फक्त ५१०००/- रु.**

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १४१ वा | गुरुवार, दि. ०२ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांडुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११


# शिंदेंचे निर्णय फडणवीसांच्या रडारवर!

## महायुती सरकारमधील कुरघोडी चव्हाट्यावर?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात महायुती सरकारने प्रचंड बहुमतासह सत्तेत पुनरागमन केले आहे. महायुती सरकारमध्ये भाजपकडून शिवसेना आणि राष्ट्रवादीची कोंडी करण्याचे प्रयत्न होतील अशी चर्चा होती. निवडणूक निकालानंतर राज्यात सत्ता वाटपाचा तिढा कायम होता.

त्यामुळे महायुतीत धुसफूस सुरू असल्याची चर्चा सुरू होती. आता मागील सरकारचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात घेतलेले निर्णय विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रडारवर आले आहेत का, याची चर्चा रंगली आहे. शिंदे यांच्या कार्यकाळातील निर्णयाला स्थगिती देण्यात आल्याने चर्चांना उधाण आले आहे.



**शिंदे सरकारच्या कार्यकाळातील निर्णयाची चौकशी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटी महामंडळाचा कंत्राटी बस संदभार्तील निविदा प्रक्रिया स्थगित केली असून चौकशीचे आदेश दिले आहेत. या निविदेनुसार कार्यवाही झाली असती तर एसटी महामंडळाला 2000 कोटींचा भुर्दंड बसला असता. मात्र, मुख्यमंत्री कार्यालयाने या निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेतला. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही सगळी प्रक्रिया रद्द करत चौकशीचे आदेश दिले आहेत. मागील सरकारच्या काळात निविदेबाबत निर्णय झाला होता. मात्र, हा निर्णय अधिकाऱ्यांनी आपल्या पातळीवर घेतला असल्याचे म्हटले गेले. आता या निर्णयाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**महायुतीमध्ये कुरघोडी?**

मागील सरकारच्या काळातील काही निर्णयांची पडताळणी केली जाण्याची शक्यता आहे. यामध्ये काही निर्णय बदलले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुख्यमंत्री कार्यालयातून सगळ्या खात्यांच्या निर्णयांबाबतचा आढावा घेतला जाणार असल्याचे म्हटले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटी महामंडळाच्या कंत्राटी बस निविदा स्थगित केल्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना माहित नसल्याचे समोर आले. मुख्यमंत्री कार्यालयाने असे काही निर्णय घेण्याआधी संबंधित खात्याला कल्पना द्यायला हवी होती, अशीही दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे इतर खात्यातील निर्णयांबाबत असाच निर्णय घेतील का, अशीही चर्चा रंगली आहे. दरम्यान, मंत्र्यांना आपल्या खासगी सचिवांची नेमणूकही मुख्यमंत्री कार्यालयाच्या मंजुरीनंतर करावी लागणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून या खासगी सचिवांची सगळी माहिती घेतल्यानंतर नेमणुकीस मंजुरी देण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत महाविद्यालयांचा उत्स्फुर्त प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधुन आणि राज्यातील वाचन संस्कृती वृध्दीगंत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.01 जानेवारी 2025 ते दि.15 जानेवारी 2025 या कालावधीत ह्ववाचन संकल्प महाराष्ट्राचाह्व हा अनोखा उपक्रम राबविणेसाठी दि.20 डिसेंबर 2024 रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे.

या उपक्रमांतर्गत सामुहिक वाचन,कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा हे कार्यक्रम राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. नवीन वषाची सुरवात समाजातील सर्व घटकांतील तसेच नागरिकांनी आपल्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करुन करावी असे आवाहन मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य चंद्रकांत दादा पाटील यांनी केले आहे.

1 जानेवारी रोजी राज्यातील 6 हजार वर महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून या उपक्रमाच्या सुरुवातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या सभागृहामध्ये ग्रंथालयामध्ये सामुहिकरीत्या पुस्तकाचे वाचन सुरु केले आहे. यानिमित्ताने राज्यातील जवळजवळ 45 लाखाच्या वर विद्यार्थ्यांच्या हातात विविध प्रकाराची पुस्तके दिसून आलेत.

येत्या 15 दिवसांत सदर पुस्तक वाचन (पान 2 वर..)

## अक्कलकोटहून निघाले, गाणगापूर येण्याआधी काळाने गाठले

### भीषण अपघातात कुटुंब उद्ध्वस्त

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी भीषण अपघात झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट दर्शनासाठी आलेल्या चार भाविकांचा भीषण अपघातात मृत्यू झाला आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांवर काळानं घाला घातला आहे. या भीषण अपघातात ४ भाविकांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर ७ ते ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना अक्कलकोट ग्रामीण स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. देवदशार्नासाठी जाणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातल्याने सोलापुरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

स्वामी समर्थ दर्शनासाठी नांदेडहुन सोलापूरच्या अक्कलकोटला आले होते

अपघातात जखमी आणि मृत झालेले सर्व भाविक नांदेड जिल्ह्यातील आहेत. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ आणि गणगापूर येथील श्री दत्तच्या मंदिरांना भेट द्यायचं ठरवलं होतं. त्यानुसार ते नांदेडमधून सोलापूरला आले. त्यांनी अक्कलकोटला जाऊन श्री स्वामी समथार्चं दर्शन घेतलं. त्यानंतर ते स्कॉर्पिओ कारने गणगापूरच्या दिशेनं जात होते.



वाटेतच त्यांच्यावर काळाने घाला घातला आहे. हा अपघात इतका भीषण होता की, ४ भाविकांचा जागीच मृत्यू झाला आहे.

**मृतांची आणि जखमीची नावे**

अक्कलकोटहुन गाणगापूर येथे जाताना स्कॉर्पिओ आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये सागरबाई गंगाधर कर्णपल्ली(वय ४० वर्षे,रा केरूर,जि नांदेड), वैष्णवी हणमंत पाशावर (वय १४ वर्षे,रा केरूर जि नांदेड), गंगाधर कर्णपल्ली(वय ४५ रा,केरूर जि नांदेड),हणमंत गंगाराम पाशावर(३६ वर्षे,रा केरूर,नांदेड)अशी मृतांची नावे आहेत.

जखमींमध्ये नामदेव बालाजी वाडीकर (२९ वर्षे,रा नांदेड), ऋतुजा मोहन शीरलेवाड(वय ५ वर्षे, रा केरूर नांदेड), योगेश मोहन शीरलेवाड (वय ५ वर्षे,रा,केरूर जि नांदेड), तेजस गंगाधर मानवते (वय ३० वर्षे, आरोळ हिंगोली), कार्तिकी श्रेयस गुप्ता (वय २ वर्षे, रा. खेड पुणे), सविता हणमंत पाशावर(वय ४० वर्षे, कुंडलगी, नांदेड), पिंटू बाबूलाल गुप्ता (वय २८ वर्षे,रा चाकण पुणे), आकाश हणमंत पायावल(वय १० वर्षे, रा. कुंडलगी नांदेड), जयश्री गुप्ता (वय २५ वर्षे पुणे), छाया मोहन शीलेवाड (वय ३५ वर्षे, रा. नांदेड) अशी नावे आहेत.

## शरद पवार-अजित पवार एकत्र यावेत, दादांच्या मातोश्रींचे पांडुरंगाला साकडे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री पंढरपुरात दाखल झाल्या आहेत. आशाताई पवार यांनी नवीन वर्षाच्या पहिल्या सकाळी पंढरपुरात विठ्ठलाचं दर्शन घेतलं. नववर्षाच्या सुरुवातीला सकारात्मक ऊर्जा मिळावी यासाठी त्यांनी देवदर्शन केलं. यावेळी कुटुंबातील वाद संपूदेत, अशी मनोकामना त्यांनी पांडुरंगाच्या चरणी लीन होत केली.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वाढदिवशी अजित पवार यांनी दिल्लीतील निवासस्थानी सहकुटुंब भेट घेत परिवारातील फूट कमी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसले. त्यानंतर राष्ट्रवादीतील नेते आणि कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांमध्ये दोन्ही पवार एकत्र येण्याचा आग्रह वाढला. अगदी रोहित पवार यांच्या मातोश्री सुनंदा पवार यांनीही जाहीर इच्छा बोलून दाखवली होती.



**आशाताई काय म्हणाल्या?**

अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी पंढरपूर गाठून विठ्ठलाचं दर्शन घेतलं. "छान मागितले आशीर्वाद, देवा माज्या दादाला, सर्वांना नवं वर्ष चांगलं सुखी सुखी जाऊ देत. घरातील सगळे वाद संपू देत, असं पांडुरंगाला सांगितलं. दादाच्या मागची सगळी पीडा जाऊ देत" असं मागणं विठुरायाच्या चरणी मागितल्याचं आशाताई दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना म्हणाल्या. शरद पवार आणि अजित पवार एकत्र यावेत असं वाटतं, का असं पत्रकारांनी विचारताच, त्यांनी 'हो हो' असं प्रफुल्लित चेहऱ्याने उत्तर दिलं. त्यामुळे अप्रत्यक्षपणे त्यांनीही दोन्ही पवार एकत्र यावेत, अशी मनोकामना व्यक्त केल्याचे दिसते.

**काकांचे शिलेदार दादांच्या भेटीला**

दरम्यान, नागपूर अधिवेशनाच्या वेळी आर आर आबा यांचे सुपुत्र आणि आमदार रोहित आरआर पाटील, तसेच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे सुपुत्र सलील देशमुख यांनीही अजित पवार यांची भेट घेतली होती. दोघेही शरद पवार यांच्या पक्षाचे युवा नेते आहेत. त्याआधी शशिकांत शिंदे यांनीही अजितदादांची भेट घेतली होती.

(पान 2 वर..)

## सरपंच हत्या प्रकरणात SIT स्थापन

### IPS बसवराज तेलींसह 10 जणांची टीम; बीडमधील तपासाला वेग



**बीड (कटूसत्य वृत्त):-** बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आला असून खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडलाही पोलिसांनी अटक केलीआहे. तसेच, न्यायालयाने आरोपी वाल्मिक कराडला 14 दिवसांची पोलीस कोठडी दिली असून संतोष देशमुख हत्याप्रकरणातील फरार आरोपींचाही शोध घेतला जात आहे.

आता, राज्य शासनाकडून संतोष देशमुख हत्येप्रकरणी एसआयटी (SIT) स्थापन करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वात ही समिती स्थापन करण्यात आली असून तेली यांच्यासह 10 जणांची टीम या घटनेचा सखोल तपास करणार आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या तपासला वेग येणार आहे.

(पान 2 वर..)

## प्रजासत्ताक दिनाला आता उपक्रमांची जोड

### शालेय शिक्षण विभागाचा आदेश

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** देशाची संस्कृती, इतिहास आणि भविष्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये अभिमान निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत येत्या प्रजासत्ताक दिनापासून (२६ जानेवारी) राज्यातील शाळांमध्ये उपक्रम राबवण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्यात ध्वजावंदनानंतर प्रभात फेरी, भाषण स्पर्धा, नृत्य, खेळ असे उपक्रम राबवून प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. या निर्णयानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये ध्वजवंदनानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत गायन, राज्यगीत गायन, भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन, देशभक्तिपर गीत गायन करावे. शाळेच्या परिसरात प्रभात फेरी काढावी. विद्यार्थ्यांकरिता




स्वातंत्र्यसैनिक, देशभक्ती, लोकशाही अशा विषयांवर भाषण स्पर्धा आयोजित करावी. विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या किंवा इतर कवींच्या देशभक्तिपर कवितांचे वाचन करावे. विद्यार्थ्यांकरिता देशभक्तिपर गाण्यांवर नृत्य स्पर्धा, देशभक्तिपर विषयांवर चित्रकला, निबंध स्पर्धा आयोजित करावी. विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे खेळ आयोजित करावेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तकला, चित्रकला इत्यादी कलांची प्रदर्शनी आयोजित करावी. संबंधित कार्यक्रम आयोजित करताना विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करावा.

(पान 2 वर..)


श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था, संचलित

**शार्वी अभ्यासिका**

दि. १५ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत

**जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक अभ्यासिका**

**वैशिष्ट्ये**

- ✓ वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
- ✓ शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रत्येक जागा आरक्षित
- ✓ मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था स्वतंत्र प्रसाधनगृह
- ✓ दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
- ✓ आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प प्रदुषणमुक्त वातावरण
- ✓ लॅपटॉप, मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईट मर्यादित प्रवेश क्षमता
- ✓ वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन वाहन तळाची सोय
- ✓ वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत



पत्ता : एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.

संपर्क : (०२१७) २६०५०९१ /८८५६९२७९४७



शासनमान्य

**ग्रंथपालन वर्गाचे आयोजन**

**प्रवेश प्रवेश प्रवेश**

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सोलापूर केंद्रासाठी प्रवेश सुरू. ग्रंथालयांना प्रशिक्षीत ग्रंथपाल उपलब्ध व्हावा यासाठी जानेवारी ते जून या कालावधीत सोलापूर येथे ग्रंथपालन वर्गाचे आयोजन केले आहे. सार्वजनिक वाचनालये, संस्थांची वाचनालये तसेच शालेय वाचनालये या ठिकाणी नोकरी मिळू शकते.

डि.एड. समकक्ष कोर्स असून शिक्षकाप्रमाणे पगार मिळतो. नियमीत शिक्षणाचे वर्ष वाया जात नाही. मूळ कागदपत्रे ठेऊन घेतली जात नाहीत. वयोमर्यादेची अट नाही.

**- प्रवेश पात्रता -**

प्रवेशासाठी :- १२ वी पास गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड प्रमाणित प्रती, ३ ओळखपत्र साईज फोटोसह

संपर्क करा - सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, हुतात्मा स्मारक, मार्कंडेय उद्यान, अशोक चौक पोलिस चौकी समोर, सोलापूर.

**ग्रंथपालन वर्गाचा अभ्यासक्रम**

| विषय | लेखी | गृहपाठ | एकूण |
|---|---|---|---|
| १) ग्रंथालय आणि समाज | १०० | - | १०० |
| २) ग्रंथालय व्यवस्थापन | १०० | - | १०० |
| ३) वर्गीकरण आणि तालिकीकरण तात्विक | १०० | - | १०० |
| ४) वर्गीकरण आणि तालिकीकरण प्रात्यक्षिक | ८० | २० | १०० |
| ५) माहिती साधने आणि सेवा | १०० | - | १०० |
| ६) ग्रंथालय तंत्रज्ञान | १०० | - | १०० |
| ७) कार्यानुभव प्रकल्प<br>प्रत्यक्ष कामकाज - ६०<br>कात्रण प्रकल्प - १५<br>ग्रंथसुची / ग्रंथ परीक्षण - १५<br>प्रत्यक्ष मुलाखत - १० | १०० | - | १०० |

ग्रंथमित्र कुंडलिक मोरे<br>वर्गव्यवस्थापक<br>मो.:९८९०९०८३२०<br>९४०४६६६४८८

सौ. वृषाली हजारे<br>लिपीक / शिक्षीका<br>मो.:७३५०९२२२७६

सौ. सारिका माडीकर<br>लिपीक<br>मो.:८३०८१७८५५१

ग्रंथमित्र विजयकुमार पवार<br>(अध्यक्ष)<br>मो.९७६३०५८०२२

श्री. साहेबराव शिंदे - कार्यवाह<br>मो.९४२१०२४०७२

## संपादकीय

# शरणागती नाट्य

गेले काही दिवस महाराष्ट्रभर सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि त्या हत्येचा संशय असलेला वाल्मिक कराड आणि त्याचे साथीदार तसेच पडद्यामागचे सूत्रधार हा विषय खूप गाजतो आहे. संतोष देशमुख यांची 9 डिसेंबर रोजी हत्या झाली आणि 31 डिसेंबर रोजी या हत्या प्रकरणात ज्यांची प्रामुख्याने चर्चा सुरू आहे तो वाल्मिक कराड नावाचा इसम पुण्याचे सीआयडी मुख्यालयात तपास यंत्रणेपुढे शरण आला. प्रत्यक्ष हत्या घडल्यानंतर सुमारे 20 ते 22 दिवस महाराष्ट्रभर या विषयाने खळबळ माजली. केवळ विधानसभेतच नव्हे तर देशाच्या संसदेत याविषयी चर्चा केली गेली. यातील चार आरोपींना अटक झाली असली तरी वाल्मिक कराड यासह अन्य तीन प्रमुख आरोपी आतापर्यंत फरारी होते. या प्रकरणातील आरोपींना अटक करा, या मागणीसाठी लाखोंचे मोर्चे निघाले. प्रसारमाध्यमांनीही हा विषय लावून धरला. तरीही वाल्मिक कराड राज्याच्या पोलीस यंत्रणेला सापडू शकत नव्हता. शेवटी हा तपास सीआयडीकडे देण्यात आला.

सीआयडी आणि पोलिसांची म्हणे 18 पथके आरोपींच्या शोधासाठी तैनात केली गेली होती. पण वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदाराचा मागूस लागत नव्हता. हे सगळे प्रकरण रहस्यमय पातळीवर गेले होते. यातले काही मुद्दे विलक्षण चक्रावून टाकणारे आहेत. या वाल्मिक कराडला पोलीस संरक्षण होते. 11 डिसेंबर रोजी वाल्मिक कराड याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला. त्यानंतरही चार दिवस म्हणजे 15 डिसेंबरपर्यंत तो म्हणे पोलीस संरक्षणातच फिरत होता. पोलीस संरक्षणात फिरणारा माणूस पोलिसांना सापडत नाही ही अजबच तऱ्हा या राज्यात पहिल्यांदा पाहायला मिळाली. त्यानंतर तो पोलिसांना तर सोडाच पण सीआयडीलासुद्धा सापडू शकत नव्हता. आज मात्र तो आरामात स्वतःचे नगरसेवक समर्थक आणि कार्यकर्त्यांसमवेत एखाद्या बादशहाच्या थाटात सीआयडी मुख्यालयात स्वतःहून हजर झाला. राज्यभर ज्याची चर्चा होती तो आरोपी पोलिसांना न सापडल्यानंतर तो स्वतःहून शरण येणे ही बाब राज्यातल्या कायदा सुव्यवस्था सांभाळणाऱ्या यंत्रणेला निश्चितच भूषणावह नाही. त्याच्या शरणागतीवर राजकीय वतुळातून अनेक प्रतिक्रिया आल्या आहेत.

ही शरणागती नसून एक प्रकारचे सेटिंग होते असा आरोप जितेंद्र आव्हाड, अंजली दमानिया वगैरे लोकांनी केला आहे. भास्कर जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार काल धनंजय मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथी गृहावर प्रदीर्घ चर्चा झाली आणि आज वाल्मिक कराड सीआयडीसमोर शरण आला हे दोन संदर्भ एकमेकांशी नीट जुळवले तर त्यातून बरेच निष्कर्ष निघू शकतात असे भास्करराव जाधवांचे म्हणणे आहे. वाल्मिक कराड हे एकूणातच अजब रसायन आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यालयातील एक साधा कर्मचारी अशी त्याची प्रारंभिक ओळख होती. त्यानंतर जेव्हा धनंजय मुंडे यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्यापासून फारकत घेतली तेव्हापासून तो धनंजय मुंडे यांची साथसंगत करीत राहिला आहे. त्यांच्याबरोबर राजकीय क्षेत्रात त्याने प्रदीर्घ वाटचाल केली आहे.

बीड परिसरातील अनेक गुन्ह्यांमध्ये त्याचा हात असल्याचा नुसता आरोपच नव्हे तर त्याच्यावर त्या अनुषंगाने गुन्हेही दाखल झालेले आहेत. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर धनंजय मुंडे यांच्या आशीर्वादानेच तो या कारवाया करीत राहिला आहे असे अनेक आमदारांचे म्हणणे आहे. आजवर आपण बिहार आणि उत्तर प्रदेशातील बाहुबली राजकीय नेत्यांच्या कथा ऐकत आलो होतो, पण तेच कथानक बीडमध्ये वर्षानुवर्षे चालू होते त्याला कुठेच वाचा फुटत नव्हती. अखेर संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येनंतर या सगळ्या कारनाम्याला वाचा फुटली आहे.

अजूनही देशमुख हत्या प्रकरणातील तीन आरोपी फरारच आहेत. आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा जो तपशील सादर केला, तो ऐकताना सारे सभागृह अवाक झाले होते.

एका आमदाराच्या म्हणण्यानुसार सुरेश धस आणखी पाच मिनिटे जर अधिक बोलले असते तर सभागृहातच आमदार ढसाढसा रडले असते इतकी या हत्येची कहाणी करुण आहे. इतक्या क्रूर आणि सनसनाटी प्रकरणाला थेट विधानसभेत वाचा फुटल्यानंतर यातील आरोपी दोन-तीन दिवसातच गजाआड व्हायला हवे होते. पण त्यासाठी तब्बल 20 ते 22 दिवसांचा अवधी लागला आहे. त्यानंतरही मुख्य आरोपीला पोलीस पकडू शकले नाहीत तर तो स्वतःहून शरण येऊन जणू काही तपास यंत्रणेवर आपण उपकारच करीत आहोत अशा अविर्भावात वाल्मिक कराड सीआयडी पुढे प्रकटला आहे. त्यातही हाइट म्हणजे शरणागतीपूर्वी या कराडने स्वतःचा एक व्हिडिओ संदेश जारी करून संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांना फाशी द्या, अशी मागणी केली आहे, आपल्यावर केवळ खंडणीचा गुन्हा दाखल आहे आणि या प्रकरणात अटकपूर्व जामीन घेण्याची संधी असतानासुद्धा आपण ती न घेता चौकशीसाठी हजर राहणार आहोत आणि याची निष्पक्ष चौकशी झाल्यानंतर न्यायालय जी काही शिक्षा देईल ती आपण भोगायला तयार आहोत असे निवेदन त्याने दिले आहे.

हे सगळेच प्रकरण आणि त्याच्या तपासात झालेली चालढकल हे राज्याच्या गृहखात्यालाही शोभणारे नाही. वाल्मिक कराड आणि त्याच्या गुन्हेगारी कृत्यांचा जो तपशील या मधल्या काळात प्रसारमाध्यमातून समोर आला तो इतके दिवस कसा दडपला गेला हाच मुख्य प्रश्न आहे. कोणाच्या आशीवार्दाखाली कराड आणि त्यांच्या साथीदारांची ही सारी कृत्ये सुरू होती, त्या सूत्रधारालाही गजाआड केले पाहिजे ही मागणी जोर धरत आहे. यात सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी थेट राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेतले आहे. त्यामुळे अर्थातच मुंडे यांच्याभोवती संशयाचे दाट धुके निर्माण झाले आहे. त्यामुळे कराड प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत आणि त्याचा कोर्टात निकाल लागेपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदापासून दूर राहावे आणि निष्पक्ष चौकशीला मदत करावी, अशी मागणी सर्वच बाजूंनी होते आहे. मराठवाडा परिसरातील जनतेचा प्रक्षोभ आणि या प्रकरणी राज्यभरातून आलेल्या एकूणच प्रतिक्रिया पाहता धनंजय मुंडे हे ज्या पक्षातून येतात त्या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी याप्रकरणी आता पुढाकार घेण्याची निकडीची गरज आहे. महाराष्ट्राला बीडमधल्या एकूणच गुन्हेगारी कथानकांनी जो डाग लागला आहे तो पुसून महाराष्ट्राचा लौकिक पुन्हा प्रस्थापित करणे ही विद्यमान राज्यकर्त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी ओळखून ते या पुढील कारवाई समर्थपणे करतील अशी अपेक्षा आहे.

# नवे वर्ष ! नवे संकल्प !!

आज पासून नवीन वर्ष सुरू होत आहे. नवे संकल्प करणाऱ्यांसाठी आजचा दिवस हा शुभ मुहूर्त समजला जातो. नव्या वर्षात नवे संकल्प अनेक जण करतात. काहींचे संकल्प पूर्णत्वास जातात, तर काहींचे अर्धवट राहतात. एखादा व्यसनाधीन व्यक्ती ३१ डिसेंबरला आपल्या व्यसनाचा अमर्याद उपभोग घेऊन, १ जानेवारीपासून त्या व्यसनाचा त्याग करण्याचा संकल्प करतो. कंबरेचा घेर वाढलेले काही स्थूल लोक दररोज व्यायाम करण्याचा संकल्प नववर्षाच्या मुहूर्तावर सोडतात. एखाद्या दैवताची पूजा दररोज करण्याचा संकल्प देखील काही जण करतात. भक्ती मागार्ला लागण्याचा त्यांचा हा संकल्प त्यांच्या आध्यात्मिक गरजेतून निर्माण झालेला असतो.तापट लोक आपल्या रागावर नियंत्रण ठेवण्याचा संकल्प करतात. मधुमेह असणारे लोक गोड पदार्थ वर्ज करण्याचा संकल्प करतात. संकल्प करताना काहींच्या मनाची तयारी खंबीर,तर काहींचे मन ढळमळीत असते. खंबीर निर्धार करणाऱ्यांसाठी त्यांचा हा संकल्प 'लाईफ चेंजिंग ' ठरतो. त्यांच्या जीवनात गुणात्मक परिवर्तन होते. संकल्प हे खरंतर माणसाच्या दोन मनातील एक करार असतो. त्या दोन मनामध्ये एक असते मागे खेचणारे, निरुत्साही मन आणि दुसरे असते उत्साही, ध्येयवादी मन... या दोन्ही मनातील संघर्षामध्ये जेव्हा ध्येयवादी, उत्साही मन विजयी होते, तेव्हा त्या व्यक्तीचा संकल्प पूर्णत्वास जातो. 'स्वतःच्या मनावर तुम्ही राज्य करा; नाहीतर तुमचेच मन तुमच्यावर राज्य करेल', असं सांगितलं जातं. या वाक्यातूनच मनातील अंतर्द्वंद्व ध्यानात येतो. संकल्प करताना आपली प्रकृती, बौद्धिक कुवत आणि आर्थिक ऐपत इत्यादी गोष्टी पाहून आपण संकल्प केला पाहिजे. दररोज ५०० सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प किंवा दररोज दहा किलोमीटर धावण्याचा संकल्प आपल्या प्रकृतीला पहिल्या दिवसापासून पूर्ण करणे शक्य होणार नाही. त्यासाठी हळूहळू सुरुवात करावी लागेल. एखादी वाईट सवय मात्र झटक्यात सोडता येईल. बिडी-काडी अन तंबाखू, गुटखा यासारखी व्यसनं एक जानेवारीला एका दिवसात सुटली जातील. पुढील वर्षभर फक्त त्याच्यावर ठाम राहावं लागतं.

नवीन वर्षाचे असेही काही संकल्प करता येतील –

१) दररोज कमीत कमी २० पाने वाचन करणे.

२) दररोज साडेतीन ते ५ पाच किलोमीटर चालणे अथवा धावणे.

३) बोलून विचार करण्यापेक्षा विचार करून बोलण्याची सवय लावणे.

४) गरजू लोकांना मदत करू.

५) नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करण्यापासून स्वतःला रोखू.

६) स्वतःचे छंद जोपासण्यासाठी वेळ काढू.

७) मित्र, कुटुंबातील लोक आणि नातेवाईक यांना वेळ देऊ.

८) स्थानिक कलावंत, कारागीर आणि शेतकरी यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य ती कृती करू.

९) व्यसनाधीन आणि वाम मार्गाला लागलेल्यांचे समुपदेशन करू.

१०) स्वतःच्या तसेच समाजाच्या आचार-विचारांचे नैतिक पातळीवर सतत मूल्यमापन करू.

आपले संकल्प पूर्ण होण्यासाठी पुढील गोष्टी जाणीवपूर्वक केल्या पाहिजेत –

१) आपल्या संकल्प पूर्ततेसाठी जवळच्या लोकांना आपल्या संकल्पात सामील करून घेतले पाहिजे. त्यामुळे त्या लोकांचा आपल्यावर दबाव राहील व त्यांची सोबत देखील मिळेल.

२) आपला संकल्प सर्वांसमोर जाहीर करा. यामुळे संकल्प पूर्ण करणे आणि त्यावर ठाम राहणे यामध्ये आपली प्रतिष्ठा पणाला लागेल.

३)संकप्ल पूर्ण करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन करा.

नववषार्चे केलेले तुमचे सर्व संकल्प पूर्ण होओत, ही नववषार्ची आपणा सर्वांना शुभेच्छा !



- **किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

पान १ वरून

## सरपंच हत्या प्रकरणात SIT...

मस्साजोग, ता. केज, जि. बीड येथील सरपंच श्री. संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपरोक्त संदर्भ येथील शासन निर्णयान्वये विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. सदर पथकात पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नियुक्ती करण्याची बाब शासन विचाराधीन होती, त्यानुसार ही एसआयटी गठित करण्यात आल्याचं गृह विभागाने परिपत्रकातून म्हटलं आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलीस ठाणे, बीड येथे गु. र. क्र. ६३७/२०२४ भा.न्या.सं., कलम १४०(१), १२६(२), ११८(१), ३२४(४) (५), १८९(२), १९१(२), १९०, १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली (भा.पो.से.), पोलीस उपमहानिरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा (EOW), सी.आय.डी., पुणे यांच्या अध्यक्षतेखाली "विशेष तपास पथक (SIT)" स्थापन करण्यात आले आहे. तसेच, बसवराज तेली यांनी शासनाकडे मागणी केल्यानुसार सदर विशेष तपास पथकामध्ये खालील काही अधिकारी व अंमलदार यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

**10 जणांची SIT टीम**

1. आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली – पोलीस उपमहानिरीक्षक
2. अनिल गुजर – पो. उप अधीक्षक
3. विजयसिंग शिवलाल जोनवाल– स.पो. निरीक्षक
4. महेश विघ्ने – पो.उ.निरीक्षक
5. आनंद शंकर शिंदे– पो. उ.निरीक्षक
6. तुळशीराम जगताप – सहा. पो. उ. निरीक्षक
7. मनोज राजेंद्र वाघ – पोलीस हवालदार/१३
8. चंद्रकांत एस.काळकुटे – पोलीस नाईक /१८२६
9. बाळासाहेब देविदास अहंकारे – पोलीस नाईक/१६७३
10. संतोष भगवानराव गित्ते – पोलीस शिपाई/४७१

**बसवराज तेली 2010 चे IPS अधिकारी**

नागपूर शहर पोलीस उपायुक्त म्हणून जबाबदारी पार पाडल्यानंतर बसवराज तेली यांच्याकडे सांगलीच्या पोलीस अधीक्षकपदाची जबाबदारी देण्यातआली होती. सन 2010 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डॉ. तेली हे एमबीबीएस डॉक्टर असून ते मूळचे बेळगाव जिल्ह्यातील रायबाग तालुक्यातील खंदीबुद या गावाचे सुपुत्र आहेत. पोलीस दलातील त्यांच्या सेवेस महाराष्ट्रातील पाचोरा (जि. जळगाव) येथून झाली. त्यानंतर त्यांनी औरंगाबाद येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून, पुणे येथे शह उपायुक्त म्हणून काम केले. तर, सांगलीचे पोलीस अधीक्षकपदही सांभाळले होते, सध्या ते पोलीस उपमहानिरीक्षकपदावर कार्यरत आहेत.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत महाविद्यालयांचा...

पूर्ण करण्याचा संकल्प या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्यांने केला आहे. तसेच येत्या पंधरवडयात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढावे यासाठी वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक लेखकांना महाविद्यालयात निमंत्रितकरुन विद्यार्थी ञ्च वाचक- व लेखक या परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन पंधरवडा निमितीत्ताने महाविद्यालयांमध्ये पुस्तक परिक्षण स्पर्धा आणि पुस्तक कथन स्पर्धा आयोजितकरण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी करुन घेतले व वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी त्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकांची निवड करुन पुस्तकासंबंधीचे अभिप्राय 15 दिवसांच्या आत महाविद्यालयास सादर करण्यासंबधी सुचित केले आहे. त्यास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे असा प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

## शरद पवार-अजित पवार एकत्र यावेत...

**काकांच्या वाढदिवशी पुतण्या सहकुटुंब भेटीला**

त्याआधी, शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अजित पवार यांनी पत्नी खासदार सुनेत्रा पवार, पुत्र पार्थ पवार यांच्यासह दिल्लीला जाऊन काकांची भेट घेतली होती. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे, प्रफुल पटेलही होते. प्रीतिसंगमावर अजित पवार-रोहित पवार यांची योगायोगाने झालेली भेट असो, किंवा सर्वात ताजी म्हणजे अजित दादांचे आमदार चेतन तुपेंनी पुण्यात शरद पवारांची घेतलेली भेट असो. दोन्ही गटांच्या मनोमीलनाचे संकेत वारंवार मिळताना दिसत आहेत.

## प्रबोधन

# कत्तलखान्याचे । परीक्षा हे नाव

परीक्षा विद्यार्थ्यांसाठी की विद्यार्थी परीक्षेसाठी, असा प्रश्न अलीकडे उदार शिक्षण पद्धतीचे पुरस्कर्ते विचारू लागले आहेत आणि त्यांना चाकोरीनिष्ठ शिक्षकांकडून योग्य उत्तर मिळेनासं झालं आहे. रूढिग्रस्त माणूस शिक्षक असो वा धार्मिक असो, तो रूढीला चिकटून बसलेला असतो आणि आपण काही चुकीचं करीत नाही, असा त्याचा दुराग्रही विश्वास असतो. त्यामुळेच जी माणसं मानवतावादी आहेत, दयाळू आहेत, संवेदनशील आहेत त्यांची मनं व्याकुळ होतात. खलील जिब्रानने त्यासाठी धार्मिक छळाला विटलेल्यांना संदेश देताना म्हटलं होतं, 'मनुष्यासाठी धर्म आहे, धमार्साठी मनुष्य नाही.' वरील प्रश्नाचं उत्तर म्हणूनच 'परीक्षा विद्याथ्यार्साठी असतात, विद्यार्थी परीक्षेसाठी नसतो,' हे आहे. आज परीक्षांच्या चरकात विद्यार्थी पिळून निघतो आहे, ही बाब घोर चिंता लावणारी आहे, यात वादच नाही.

थोर पुरुषांचे विचार रूढिबद्ध नसतात. त्यांना शिक्षणक्षेत्रातील या परीक्षांचा आणि फलस्वरूप मिळणाऱ्या पदव्यांचा मनस्वी तिटकारा होता. डॉ.पंजाबराव देशमुख हे थोर समाजसेवक, कर्मयोगी होते. ते म्हणतात, 'विद्यापीठाच्या मोठमोठ्या पदव्यांनी केवळ माणसाचे मोठेपण व कर्तृत्व यांचे मोजमाप होत नाही. जगातील सर्व विद्यापीठांच्या सर्वोच्च पदव्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या व्यक्तीच्या सेवेचं व कायार्चं मूल्यमापन होऊ शकणार नाही.' भाऊरावांनी स्वतः पदवीधर नसतानाही शिक्षणकायार्चा जो हिमालय स्वकर्तृत्वाने, त्यागाने उभा केला, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. छत्रपती शाहू महाराज हे केवळ एका संस्थानाचे राजे नव्हते, तर ते नव्या युगातील उदारमतवादी, लोकशाहीनिष्ठ, समतावादी विचारवंतही होते. आपण आपलं राज्य जनतेच्या हाती लवकर द्यावं, असं त्यांना वाटे. ते म्हणाले, 'माझी प्रजा इयत्ता दुसरी शिकली, तरी मी माझं राज्य तिच्या ताब्यात द्यायला तयार आहे.' त्यांच्या व्यावहारिक मनाचा हा निष्कर्ष परीक्षांपेक्षा शहाणपणावर आधारलेला होता.

थोर पुरुषांचे विचार रूढ व्यवहाराहून भिन्न असले, तरी शिक्षण म्हटलं की आज तरी परीक्षेला पर्याय नाही. परीक्षेशिवाय विद्याथ्यार्ची ज्ञानग्रहणक्षमता, ज्ञानसंचय पातळी, ज्ञानाकलन, ज्ञानाधिकार कळू शकणारच नाही म्हणून शिक्षणव्यवस्थेने परीक्षा घेणं सुरू केलं. पण ती ज्ञानाची खरी परीक्षा नसते, हे पदापेदी अनुभवास येत असतं. उच्चशिक्षित माणसं व्यवहारात नापास झालेली दिसतात. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ न्यूटनने आपल्या घरची मांजरी व्याल्यावर बंद दाराला एक मोठं भोक आणि एक लहान भोक पाडलं आणि मांजरीच्या मागून पिल्लं घरात आल्यावर आपली चूक त्याला उमगली. नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ पेरी क्यूरींना रस्त्यातील घोडागाडी चुकवता न आल्याने त्यांचा मृत्यू झाला. जगप्रसिद्ध रँगलर रामानुजम इंग्लंडच्या थंडीत त्रिकालस्नानाने न्यूमोनिया होऊन मरण पावले. अशा ज्ञानवंताच्या व्यवहारज्ञानाची वेगळी परीक्षा घ्यायला हवी.

विद्यार्थी कसा असावा, त्याने परीक्षार्थी म्हणून काय करावं, काय करू नये, याचे नियम आहेत. पण पेपर काढणारे, पेपर तपासणारे कसे असावेत, या विषयीचे नियम अत्यल्प आहेत. प्रश्नपत्रिका पाठ्यक्रमबाह्य (out of syllabus) निघतात, प्रश्नपत्रिकेची काठिण्यपातळी उच्चतम असते, त्यामुळे पाच टक्के विद्यार्थी पास होऊच शकत नाहीत. या प्रकाराला कत्तलखाना असं नाव शहाणी माणसं देतात. अशा गोष्टींना जे जबाबदार असतील, त्यांना धाक घालण्याचं काम कोणी केलं आहे ? मेडिकल आणि इंजिनीयरिंगच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देताना जातीयवादी परीक्षक भेटला, की त्यांचा घात होतो. या समस्येचं चिंतनही कोणी केलेलं नाही आणि त्यावर इलाजही कोणा परीक्षा मंडळाने अथवा विश्व विद्यालयांनी योजलेले नाहीत. महात्मा फुलेंनी स्वजातीचा शिक्षक पाहिजे, असं उगाच म्हटलं नव्हतं. एकूण परीक्षक, प्राश्निक, पर्यवेक्षक, परीक्षा नियंत्रक, यांच्यामधील विद्यार्थ्यांविषयीची अनास्था आणि बेदरकारपणा ह्या समस्या मुख्य आहेत. परीक्षांच्या बहिरंगाचा विचार जितका झाला, तितका अंतरंगाचा झालेला नाही. परिणामी, किती विद्यार्थी आणि त्यांचे पालक बळी गेले, याचा पुरेशा गांभीयार्ने विचार शिक्षणतज्ज्ञांनी करायला हवा.

परीक्षांना पर्याय नसेल, पण त्यांच्या स्वरूपांना पर्याय शोधला गेला पाहिजे. परीक्षांचा हुकूमशाही चेहरा अधिक समंजस कसा होईल, तो विकृत होणार नाही याविषयी कोणती खरबदारी घेता येईल, हे सर्व माणुसकीच्या दृष्टिकोनातून निश्चित करता आलं पाहिजे. परीक्षेच्या झाडाला वषार्तून एकदा किंवा दोनदा बहर यावा आणि इच्छुकांनी तो हंगाम साधण्याची केविलवाणी धडपड करावी, हे निरंतन शिक्षण यासारखे शब्द प्रचारात आणणाऱ्या शिक्षणव्यवस्थांना शोभून दिसणारं नाही. शिक्षण 'विद्यार्थीकेंद्री' असलं पाहिजे, हे तत्त्व अबाधित राहील, हे शिक्षणव्यवस्थेने सतत जागरूकपणे पाहिलं पाहिजे. कारण–

चरकात ऊस । पिळून निघतो
परीक्षार्थी तसा । त्रस्त होतो ॥ १
शिक्षार्थीचें होते । चिपाडे सुकले
तसे हाल झाले । परीक्षेने ॥ २
परीक्षका नाही । दयामाया काही
म्हणावे कसायी । क्रूर त्यांना ॥ ३
जात पाहूनिया । खाली वर नेतो
कोणा न कळतो। खेळ त्यांचा ॥४
परीक्षाफलास । म्हणती निकाल
लागतो निकाल । विद्यार्थ्यांचा ॥५
मोडीत काढावी । परीक्षाव्यवस्था
ज्ञानाठायी आस्था । तिची नाही ॥ ६
कत्तलखान्याचे। परीक्षा हे नाव
आणा अभिनव । जुन्या जागी ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# आ.अभिजीत पाटील यांनी घेतली ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेची भेट

## माढा शहरातील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स ची यासाठी निधी मिळावा आमदार पाटील यांची मागणी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसेभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे याची मुंबई येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे पत्र दिले. माढा येथे जिल्हा परिषद जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी आवश्यक निधी मिळावा याकरिता ग्रामविकास मंत्री ना.श्री.जयकुमार गोरे साहेब यांना निवेदन दिले. माढा शहरामधील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये २मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच जागेतील आतील बाजुस क्लासरूम व शाळेसाठी वॉल कंपाऊंड तयार करणे ही गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी मंजुर करण्यात यावा,अशी मागणी केल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.



# जीहे कटापूर योजनेचे पाणी माळशिरस तालुक्यातील गावांना देणार- मंत्री जयकुमार गोरे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** जीहे कटापूर योजनेचे पाणी पावसाळी हंगामात माळशिरस तालुक्यातील गावांना देणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री ना. जयकुमार गोरे यांनी सांगितले. ना. गोरे यांच्या आंधळी येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांना माळशिरस भाजपाच्यावतीने निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले.

गत लोकसभा निवडणुकीमध्ये माळशिरस तालुक्यातील रेडे गावामध्ये जयकुमार गोरे यांनी जेहे कटापूर (ता. माण) योजनेतील पावसाळी हंगामामध्ये अतिरिक्त पाणी संभुखेड येथे सोडून ते पाणी रेडे येथील बंधारे व तलाव भरण्यासाठी देण्याचे आश्वासन पूर्ण केले. ते आमदार असताना हे आश्वासन पूर्ण केल्याने लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. माळशिरस तालुक्यातील जळभावी, माणकी, भांब, फडतरी या गावांना पाणी देण्यासाठी माण तालुक्यातील मोही, खुटबाव, इंजभाव, संभुखेड पर्यंती या गावांमधून पाणी सोडल्यास माळशिरस तालुक्यातील कन्हेर, लोणंद, इस्लामपूर गावांना याचा फायदा होईल. यावेळी सोलापूर जिल्हा सहप्रभारी के. के. पाटील, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, युवराज वाघमोडे, मिनीनाथ मगर, ॲड. गणेश सिद आदी उपस्थित होते.



## प्रजासत्ताक दिनाला आता उपक्रमांची जोड...

या उपक्रमांसाठी गावातील स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, प्रतिष्ठित नागरिकांचा सक्रिय सहभाग घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. दिलेल्या सूचनांप्रमाणे शाळांकडून प्रजासत्ताक दिन साजरा होण्याबाबत संबंधित जिल्ह्याच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षकांनी काळजी घेण्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**शाळांमध्ये उपक्रमांचा अतिरेक**

शाळांमध्ये आधीच अनेक उपक्रम राबवावे लागत असल्याने शिक्षण विभागाच्या या सूचनांबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. 'सक्ती करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देता येत नाही. अलीकडे शाळांमध्ये उपक्रमांचा अतिरेक होतो आहे. आयत्या वेळी आणि वर्षभर भारंभार उपक्रम करण्यापेक्षा वर्षभरात करायच्या उपक्रमांचे वेळापत्रक निश्चित करावे. स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल करण्याचे स्वातंत्र्य शाळांना असावे,' असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी मांडले. तर, २६ जानेवारीला अनेक शाळांमध्ये स्नेहसंमेलन असते. शासन निर्णयाने या उपक्रमांना वैधानिक रूप दिले आहे. सहशालेय उपक्रमांच्या नावाखाली वर्षभरात शाळांमध्ये होणाऱ्या उपक्रमांची संख्या बरीच जास्त आहे. त्यामुळे शिकण्या-शिकवण्याला वेळ मिळण्यासाठी वर्षभरातील उपक्रमांची संख्या मर्यादित करण्याची गरज आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटील वस्ती येथे भेटकार्ड निर्मिती कार्यशाळा संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परीषद प्राथमिक शाळा पाटीलवस्ती (६० फाटा) शाळेत २०२४ सालाला निरोप देवून २०२५ या वर्षाला रंगोत्सव साजरा करू नववषार्चा उपक्रम अंतर्गत भेटकार्ड निर्मिती कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते.



मराठी, इंग्रजी भाषेत सण समारंभावेळी देण्यात येणारे शुभेच्छा संदेश मुलांनी हसत खेळत शिकताना अंकांच्या आकडे मोडीसोबत भूमिती आकारांची सुंदर नक्षी कोरताना कागदांशी खेळत कार्यकृतींशी कलेची जोड जमली, आप्तस्वकियांना शुभेच्छा देण्यासाठी विद्यार्थ्यांमार्फत स्वनिर्मित रंगांची उधळण करत संदेश वहनाची अनोखी भेटकार्डे तयार करण्यात आली. शालेय सर्व विषयांची सांगड घालून विद्यार्थ्यांना भेटकार्ड तयार करण्यास मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ मार्गदर्शिका, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा, पत्रकार व पालक अशा अनेक भूमिका उत्कृष्ट पद्धतीने निभावणाऱ्या, सदैव शाळेच्या, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सौ. शोभा तानाजी वाघमोडे यांचे निकम व सौ.गायकवाड यांनी आभार मानले.

यावेळी जि.प. प्रा.शाळा पाटीलवस्ती येथील सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी, माता पालक, अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य, माता पालक संघ, निपुण भारत माता पालक समिती, सखी सावित्री समिती, शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्य अंगणवाडी सेविका, मदतनीस, पाटीलवस्ती शाळेतील शिक्षक व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## वात्रटिका

### शरणागती

मी शरण येतो देवा
तुम्हीच न्याय द्यावा...
फक्त एवढंच म्हणेन,
की मला हवा तसा द्यावा...
शोधूनही सापडत नाही
गुन्हेगार फरार होतो....
लोकं बोलतात की म्हणे
तसा त्यांचा करार असतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बौद्ध समाजातील लोकांनी मताचे मोल समजून घ्यावे - आ. राजाभाऊ खरे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** बौद्ध समाजातील लोकांनी आपल्या मताचे मोल समजून घ्यावे लागेल. यापुढील काळात राजकीय बदला घेण्यासाठी एकजूटीने करू. पंढरपूर या जन्मभूमी मध्ये झालेल्या हा सत्कार सर्वोच्च असल्याचे प्रतिपादन मोहोळचे आ. राजाभाऊ यांनी केले. घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ८७ वर्षापूर्वी पंढरपूर शहरातील जुना कराड नाका येथे भेट दिली होती. या दिनाचे औचित्य साधून कराड नाका ही जन्मभूमी असलेले आ. खरे हे मोहोळचे आमदार म्हणून विजयी झाल्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. पंचशील मंडळाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष आर.पी. कांबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे होते.वपन दिन आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये सामान्य कार्यकर्त्यांना लागेल ती ताकद देऊन परिवर्तन घडवू. आतापासून तयारी सुरू केली आहे असेही आ. खरे यांनी सांगितले.



यावेळी राजाभाऊ सरवदे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात ५० वर्षात बौद्ध समाजाला राजाभाऊ खरे यांच्या रूपाने केवळ दुसऱ्यांदा आमदार म्हणून संधी मिळाली आहे. मागासवर्गीय समाजासाठी मोठा निधी असतो. हा निधी दुसरीकडे वळवू नये यासह समाजाच्या प्रश्नांसाठी आ. खरे यांनी आवाज उठवावा, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक डी. बी. पाटोळे यांनी केले. आर. पी. कांबळे, सुधीर मागाडे यांनीही आ. खरे यांच्या लहानपणी पासूनच्या आठवणी सांगितल्या. यावेळी आ. खरे यांच्या पत्नी तृप्तीताई खरे, आई कांताबाई खरे, वडील ज्ञानू खरे यांचाही यथोचित सन्मा करण्यात आला. कुमार ढवळे यांनी आभार मानले.

### कॉलेज जीवनापासून आमदार होण्याचे ध्येय

आपण पंढरपुरात कॉलेजला असतानाच १९९१ मध्ये आमदार होण्याचे स्वप्न बाळगून ते ध्येय ठेवले होते. त्यासाठी तब्बल ३४ वर्ष संघर्ष करावा लागला. चळवळ कधीही न सोडता प्रचंड इच्छा शक्तीच्या जोरावर विधानसभेत जाण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. सर्वपक्षीय लोकांशी चांगले संबंध ठेवून हा विजय मिळविणे सोपे गेले. प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांचीही फार मोलाची साथ मिळाल्याचे आमदार खरे यांनी सांगितले.

# दहावी-बारावी बोर्ड परीक्षेच्या केंद्रांमध्ये वाढ!

## २४ जानेवारीपासून बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा आता काही दिवसांवर असून इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षा २४ जानेवारीपासून सुरू होणार आहे. जिल्ह्यात यंदा दहावीच्या विद्यार्थ्यांचे दोन परीक्षा केंद्रे वाढली असून जिल्ह्यातील १८४ केंद्रांवर त्यांची परीक्षा होईल. तर इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची तीन केंद्रे वाढली असून जिल्ह्यात बारावीसाठी १२४ केंद्रे असणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील इयत्ता बारावीचे जवळपास ५८ हजार विद्यार्थी तर इयत्ता दहावीतील ६३ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. बारावीच्या विद्यार्थ्यांची १२४ केंद्रांवर आणि दहावीच्या विद्यार्थ्यांची १८४ केंद्रांवर परीक्षा होईल. सध्या केंद्र संचालकांची यादी अद्ययावत केली जात आहे. दोन्ही परीक्षेसाठी सरमिसळ पद्धत असणार आहे, पण ज्या केंद्राजवळ दुसरे केंद्र नाही, अशा केंद्रांसाठी ही पद्धत लागू नाही. दुसरीकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या आदेशानुसार बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांची पाहणी केली.




कॉपीमुक्त परीक्षेसाठी भरारी पथके, बैठे पथकांचे नियोजन २१ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे बंधन घालण्यात आले आहे. त्यानुसार सर्वच शाळांमध्ये कॅमेरे बंधनकारक आहेत. याशिवाय यंदा बोर्डाच्या परीक्षेसाठी बारावीचे तीन तर दहावीचे दोन केंद्रे वाढली आहेत. कॉपीमुक्त परीक्षेसाठी भरारी पथके, बैठे पथकांचे नियोजन असणार आहे.

**- सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

त्यावेळी बहुतेक परीक्षा केंद्रांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, पण वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे.

अनेक संस्थांनी निधीचे कारण पुढे केल्याने अधिकाऱ्यांचीच कोंडी झाल्याचे चित्र आहे. तरीपण, त्यांनी शासनाच्या २१ ऑगस्ट २०२४च्या निर्णयाकडे बोट दाखवून त्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांनी मनात कोणतीही भीती न बाळगता नियोजनबद्ध अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहनही शिक्षणाधिकाऱ्यांनी केले आहे.

**परीक्षांचे वेळापत्रक असे...**

- **इयत्ता दहावी :** प्रात्यक्षिक- ३ ते २० फेब्रुवारी २०२५ आणि लेखी- २१ फेब्रुवारी ते १७ मार्चपर्यंत
- **इयत्ता बारावी :** प्रात्यक्षिक- २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५ आणि लेखी- ११ फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत

# शेतकऱ्यांमधून ऊस दराबाबत यंदा उठाव नाहीच

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने आहेत. ऊस गाळप सुरू होण्यापूर्वीच अनेक संघटना ऊसदरावरून आक्रमक होऊन लढा देतात. मात्र यंदा गाळप हंगाम सुरू होऊन दीड महिन्याचा कालावधी उलटला, अद्याप एकही संघटना दराबाबत आवाज उठवताना दिसत नाही, सर्व शेतकरी संघटना शांत बसल्याचे दिसत आहे.राज्यात सोलापूरला साखर कारखान्याचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. बॉयलर अग्निप्रदीपनची तयारी कारखान्याकडून सुरू होताच दरवर्षी ऊस दराचा विषय सुरू व्हायचा. स्वाभिमानी, बळीराजा, जनहित, शरद जोशी प्रणीत संघटनांसह अन्य संघटनेकडून ऊसाच्या दरासह इतर मागण्यांसाठी कारखान्यासह जिल्हाधिकारी आणि साखर सहसंचालकांना



निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला जात होता. यंदा मात्र सर्वत्र संघटना शांत असल्याचे दिसत आहे. सर्वच कारखान्याकडून 2700 ते 2750 या दरम्यानचा दर जाहीर करण्यात आला आहे. कारखाने एक महिना उशिराने सुरू झाले आहेत. यामुळे शेतकरी घाई करत ऊस कारखान्याला पाठवत आहेत. एखाद्या संघटनेकडून दराबाबत सहसंचालक साखर यांना निवेदन दिले. त्यानंतर मात्र संघटना आणि शेतकरी सगळेच शांत झालेले आहेत.

यंदा शेतकऱ्यांमधून उठाव झाला नाही. संघटनेकडून उसाला एफआरपी देण्याची मागणी करत निवेदन दिले. आता दर जाहीर करण्यात आलेल्या उसाचे पैसे शेतर्कयांना दिले जात आहेत. मात्र शेतर्कयांनी ज्या कारखान्यावर विश्वास असेल अशाच कारखान्याला ऊस द्यावा. उशिराने जाणाऱ्या उसाचे पैसे कारखानदाराकडून उशीर देण्याची शक्यता आहे.

**- विजय रणदिवे,** जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना

# सहा जानेवारी पत्रकार दिनानिमित्त वैद्य, नल्लामंदू, मठपती यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे 'आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हीरक महोत्सव साजरा करणाऱ्या सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वातीने दरवर्षा प्रमाणे यंदा ही ६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार दिनानिमित्त संचारकार स्व रंगा अण्णा वैद्य यांच्या स्मरणार्थ दै दिव्य मराठी चे वरिष्ठ वार्ताहर विनोद कामतकर यांना तर 'कासिदकार' स्व. अ. लतीफ नल्लामंदू यांचे नावे असलेला पुरस्कार एबीपी माझाच्या जिल्हा प्रतिनिधी आफताब अन्वर शेख यांना आणि, बार्शीचे ज्येष्ठ संपादक स्व बाबुराव मठपती यांच्या स्मरणार्थ दै तरुण भारतचे


प्रशांत माने


विनोद कामतकर


आफताब शेख

संपादक प्रशांत माने यांना जाहिर करण्यात आले अशी माहिती पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अय्यूब नल्लामंदू यांनी दिली आहे.माने, कामतकर, शेख यांना जाहिर. गौरव पत्र, पांच हजार रुपये रोख, शाल श्री फळ, पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

"आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ " चे वितरण विजापूर रोड सोलापूर येथील "पत्रकार भवन " च्या कै रंगा अण्णा वैद्य सभागृह मध्ये ६ जानेवारी २०२५ दुपारी १२ = ३० वाजता हा कार्यक्रम संघाचे अध्यक्ष अशोक मठपती यांच्या अध्यक्षतेखाली व शहर मध्य चे आमदार मा देवेंद्र कोठे यांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात येईल या वेळी सोलापूरच्या पोलीस आयुक्त मा. एम. राजकुमारजी, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

पुरस्कार प्राप्त आपल्या पत्रकार बंधुंचे कौतुक करण्यासाठी आपण या कार्यक्रमास सवार्नी वेळेवर उपस्थि रहावे, असे आवाहन निवड समितीचे अय्युब नल्लामंदू व सचिव प्रा पी पी कुलकर्णी यांनी केले आहे.

# पुण्याच्या आरोपीने रूईच्या म्हसोबा यात्रेत हवेत केला गोळीबार? मात्र पोलिसांकडून नाकार

## खुनाच्या आरोपातून जामीनावर असलेल्या आरोपीचा दहशत माजवण्याचा प्रयत्न

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील खूनाच्या गुन्ह्यांमध्ये जामीनावर सुटून आलोलेल्या आरोपीने भीमा नदीच्या काठावर असलेल्या रूई म्हसोबा येथील यात्रेमध्ये मागील भांडणाचा राग मनात धरून वडापाव, भजी विक्रेत्याला आपल्या साथीदारांसह लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने मारहाण करीत असताना भांडणे सोडवण्यासाठी आलेल्या लोकांवर आपल्या जवळ असलेल्या बंदुकीने (गावठी कट्टयाचे) पायावर व हवेत तीन गोळ्या मारुन गोळीबार करुन दहशत माजवून पलायन केल्याची घटना मंगळवार दि.३१ रोजी सकाळी ११ वाजणेचे सुमारास घडल्याने यात्रेसाठी आलेल्या यात्रेकरू व नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माढा तालुक्यातील कोंढार भागात प्रसिद्ध देवस्थान असलेल्या रूई येथील म्हसोबा देवस्थान येथे आज मंगळवार निमित्त यात्रा असते या यात्रेसाठी हजारो भक्त येत असतात मंगळवारी सकाळी 10.30 चे सुमारास संशयित आरोपी आरमान अल्लाउद्दीन शेख व राहणार रुई तालुका माढा जिल्हा सोलापूर हा आपल्या एक साथिदारासह मंदिराच्या बाजूला वडापाव,भजी व भेळ विक्रेता असलेल्या बशीर मौला मुलानी वय 30 राहणार रुई तालुका माढा



यास भजी बनवत असताना दोघांचे वडीलामध्ये चार महिन्यामपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून बशीर मुलानीच्या डोक्यात रॉड मारला व त्याचे साथीदाराने लाकडी दांडक्याने मारहाण करीत होते.मारहाण सुरु असताना यात्रेच्या नियोजनातील नागरिक आणि तरूणांनी सोडवा सोडली करताना संशयित आरोपी अरमान शेख याने कंबरेला असलेले गावठी पिस्तूल काढून हवेत फायरिंग केले भांडण सोडविण्यासाठी आलेल्या लोकांचे दिशेने जमीनीवर दोन ते तीन फायरिंग केले यामध्ये दुर्दैवाने कोणी जखमी झाले नाही मात्र यात्रेसाठी आलेले भाविकांची भीतीपुटी धांदर उडून पळापळ चालू झाली होती. या घटनेचे फक्त बघतात तालुक्यात चर्चा झाली असून. या फायरिंगच्या आवाजाने भाविकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याने अनेक भाविकांनी देवाच्या दर्शनाला जाण्याचे आज टाळले तर जखमी बशीर मौला मुलानी हे टेंभुणीर्तील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत

असून वरील घटनेची टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद जावेद बाळू काझी (वय 38), राहणार रूई तालूका माढा यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिरत दिली असून या फियार्दीमध्ये म्हटले आहे की या ठिकाणी गोळीबार झाला नाही मात्र ज्या ठिकाणी भांडणे झाले त्या ठिकाणी एक खाली पडलेले गोळी मिळून आले असून व झटापटीत त्याच्याजवळ कमरेला असलेला गावठी पिस्तूल खाली पडला व त्यातील गोळी जमिनीवर पडली अशी फिर्याद टेंभुर्णी पोलीस मध्ये दाखल झाले असून पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या पीएसआय स्वाती सुरवसे व पोलीस कॉन्स्टेबल सरडे तपास करीत आहेत वरील घटनास्थळी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी भेट दिली असून पुढील तपास आरोपीचा शोध घेण्यासाठी एक पथक नेमले असल्याचे सांगितले आज 31 डिसेंबर असल्याने व उद्या नवीन वर्ष सुरुवात असल्याने या घटनेची गंभीर दखल घेऊन टेंभुर्णी पोलीस स्टेशन ने कुठलीही कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून कडक बंदोबस्त ठेवला आहे वरील दिलेल्या फिरादीवरून टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजिस्टर नंबर 790/ 24 भारतीय न्याय संहिता चे कलम 118/1, ३/५ शस्त्र अधिक नियम चे कलम 3,7,25 प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे

# स्कूल कनेक्ट अभियानाचा दयानंद महाविद्यालयातून प्रारंभ!



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात आपल्या आवडी व छंदाप्रमाणे शिक्षण घेण्याची संधी असून कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

नवीन 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020' मुळे उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण आणि व्यापक बदल होत असल्याने त्याची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणाच्या उद्देशाने 'राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 स्कूल कनेक्ट' संपर्क अभियान शहर व जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि उच्च शिक्षण विभागाच्या संचालिका डॉ. नलिनी टेंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली याचा शुभारंभ मंगळवारी दयानंद शिक्षण संस्था येथून प्र-कुलगुरू प्रा. दामा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्यासह दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्राचार्य डॉ. विजय उबाळे, प्राचार्य डॉ. बी. एस. दामजी, प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, प्राचार्य डॉ. क्षीरसागर, प्राचार्य डॉ. गायकवाड, दयानंद असावा प्रशालेचे मुख्याध्यापक प्रा. पवार आदी उपस्थित होते.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. दामा यांनी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा आढावा घेत शिक्षण क्षेत्रातील बदलाची माहिती दिली. विद्यार्थ्यांची क्रेडिट बँक, कौशल्य विकास कोर्सेस आणि दरवर्षी मिळणारे विविध प्रमाणपत्र आणि आव्हाने पेलण्यासाठी या नव्या शिक्षण धोरणात चांगले बदल करण्यात आले आहेत. निश्चितच याचा प्रगतीसाठी फायदा होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डॉ. गौतम कांबळे यांनी जगातील शिक्षण व्यवस्थेची माहिती देत नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची वैशिष्ट्ये सांगितले.

# जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्रामार्फत हॉकी या खेळाचे प्रशिक्षण केंद्र सुरु

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रामार्फत हॉकी या खेळाचे प्रशिक्षण केंद्र जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर, इंडियन मॉडेल स्कूल व सहस्त्रार्जून हायस्कूल सोलापूर येथे सुरु करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली. प्रशिक्षण केंद्राच्याठिकाणी खेळाडूंना तंत्र शुध्द मार्गदर्शन देण्यासाठी हॉकी या खेळाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती वैशाली सुळ हे प्रशिक्षण देणार असून ज्या विदयार्थी व खेळाडूंना प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी आपली नावे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत श्रीमती वैशाली सुळ (मो.नं. ७४४७४९१८८८) यांच्याकडे नोंदवावीत. तसेच सदर प्रशिक्षण केंद्र नियमितपणे सुरु असून, प्रशिक्षणाची वेळ सकाळी ६.३० ते ९.३० वाजता व सायकांळी ४.०० ते ६.३० वाजता. अशी असून विदयार्थी व खेळाडूंना याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# महिला समृद्धी योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील समाज बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. महिला समृद्धी योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी 10 जानेवारीपर्यत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एच.चव्हाण यांनी केले आहे.

सन 2024-25 या वित्तीय वषार्साठी राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ दिल्ली व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत महिला समृध्दी योजनेसाठी 1 लाख 40 हजार रुपया प्रमाणे योजना सुरु करण्यात आली असून यामध्ये शहरी व ग्रामीण भागासाठी 50 टक्के आरक्षण होते, सदर योजनेचे अर्ज सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु महिला समृध्दी योजने अंतर्गत उद्दिष्टापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले असल्याने योजनेच्या उद्दिष्ट पुतीर्साठी लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या आहेत.

महिला समृध्दी योजने अंतर्गत कर्ज मागणी अर्ज वितरणाची व स्विकारण्याची कार्यवाही दिनांक 30 डिसेंबर 2024 ते दिनांक 10 जानेवारी 2025 पर्यत महामंडळाचे कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह, सात रस्ता, शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागे, बीग बजार समोर, सोलापूर सुरु असून, या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर.एच.चव्हाण, यांनी केले आहे.

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा प्रथम ॲडव्हान्स प्रती मे. टन रक्कम रु. २,८००/- प्रमाणे जाहीर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे सिझन २०२४-२५ मध्ये २८ डिसेंबर २०२४ पासून गळीतास आलेल्या ऊसास प्रती मे. टन रक्कम रु.२,८००/- प्रमाणे प्रथम ॲडव्हान्स जाहिर करणेत येत असून दिपावली सणाकरीता रक्कम रु.१००/- असा एकुण रक्कम रु.२,९००/- प्रति मे. टन ऊस दर देण्यात येणार आहे. तसेच यापुर्वी जाहीर केलेप्रमाणे माहे-फेब्रुवारी २०२५ पासून पुढे गाळपास येणा-या ऊसाकरीता प्रति मे.टन रक्कम रु.१००/- अनुदान देण्यात येणार असून ते दिपावली सणाचे बिलाबरोबर अदा करणेत येणार असलेबाबतची माहिती कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी दिली.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटीलस यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.कारखान्याचा सिझन २०२४-२५ चा ऊस गळीत हंगाम दिनांक १५/११/२०२४ रोजी सुरु झाला असून दि.३०/१२/२०२४ अखेर ३ लाख ४७ हजार ५६३ मे. टन ऊसाचे गाळप होऊन ३ लाख १५ हजार ५०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले असून सरासरी साखर उतारा ९.८५% मिळाला आहे. सध्या प्रति दिवस ८००० मे.टन याप्रमाणे ऊसाचे गाळप होत आहे. चालू सिझन २०२४-२५ मध्ये को-जन वीज निर्मिती प्रकल्प दिनांक ७/११/२०२४ रोजी सुरु झाला असून दि.३०/१२/२०२५ अखेर ३ कोटी ०८ लाख २७ हजार ६०० युनीट वीज निर्माण झाली असून त्यामधुन १ लाख ८८ लाख ९१ हजार ५०० युनिट वीज विक्री केलेली आहे.तसेच उपपदार्थ प्रकल्प डिस्टीलरीमध्ये दि.३०/१२/२०२४ अखेर सी व बी हेवी पासून ५० लाख ५९ हजार ११६ लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीट तसेच ४५ लाख ५५ हजार ६७६ लिटर्स इथेनॉल उत्पादन झाले असलेची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली.



यावेळी प्रसंगी कारखान्याचो व्हाईस चेअरमन शंकरराव माने देशमुख, संचालिका, स्वरुपाराणी मोहिते-पाटील, तसेच संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक, प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक - रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक-पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, कालीदास मिसाळ, दत्तात्रय चव्हाण, विनायक केचे, राजेंद्र भोसले, अमृतराज माने-देशमुख, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, सौ. हषार्ली निंबाळकर, श्रीमती पुष्पा महाडीक उपस्थित होते.

# वृक्ष संवर्धन समितीच्या अखंड श्रमदानास दोन हजार दिवस पूर्ण

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** वृक्ष संवर्धन बार्शी च्या दररोज चालणाऱ्या अखंडीत श्रमदानास आज दोन हजार दिवस पूर्ण झाले. साडेपाच वषार्पासून वृक्ष संवर्धन समितीचे श्रमदान दररोज सकाळी सहा ते आठ यादरम्यान चालते. 5 जून 2019 पासून सुरू झालेले हे कार्य आजपर्यंत अखंडित सुरू आहे. या पाच वर्षात वृक्ष संवर्धन समिती मार्फत बार्शी शहर व परिसरात जवळजवळ पंचवीस हजार वृक्ष लागवड करून ती संवर्धित करण्यात आली आहे. उन्हाळा असो पावसाळा असो किंवा हिवाळा एकही दिवस खंड न पडता वृक्ष संवर्धन समितीचे कार्य सुरू आहे.




करोणा सारख्या महामारीत देखील हे कार्य सर्व नियम पाळून अखंडीत सुरू होते. दररोज च्या या श्रमदानात वृक्ष लागवड करणे, लावलेल्या झाडांना आळी करणे,पाणी देणे, काळी माती टाकने,खत टाकने, वाकलेल्या झाडांना सरळ करणे, त्याची योग्य कटाई करणे, परिसर स्वच्छता करणे आदी कार्य केले जाते. या पाच वर्षात वृक्ष संवर्धन समिती ने शहरातील अनेक मोठे रस्ते, अंतर्गत रस्ते, ओपन स्पेस, शासकीय कार्यालय, विविध शाळा, स्मशानभूमी, मंदिर परिसर, आदी ठिकाणी वृक्ष लागवड करून वृक्षांचे संवर्धन केले आहे. वृक्ष संवर्धन समितीची दुर्मिळ वृक्षांची नर्सरी देखील आहे. यामध्ये दुर्मिळ वृक्षांच्या बिया गोळा करून त्याची रोपे बनवली जातात व नंतर ती योग्य ठिकाणी लावली जातात. वृक्ष संवर्धन समितीमार्फत शहरात दोन ठिकाणी दुर्मिळ वृक्षांचे उद्यान देखील उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये विविध जातीची देशी आणि दुर्मिळ होत असलेली झाडे लावून ती संवर्धित केली जात आहेत. अशी माहिती वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी दिली. अशा या अखंडित आणि अविरत श्रमदानाचा 2000 वा दिवस आज शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला. यावेळी कॅन्सर तज्ञ डॉ. राहुल मांजरे, प्रा. शशिकांत धोत्रे, हेल्थ क्लबचे भगवान लोकरे, पवन कुमार देशमुख, मदन देगावकर, संतोष घावटे हे उपस्थित होते. यावेळी वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य तसेच हेल्थ क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.